**गृह विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १९ सप्टेंबर २०१९

**अधिसूचना**

**महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम.**

क्रमांक एमआयएस-०३१९/प्र.क्र.९२/राउशु-३.—ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनास असे वाटते की, महाराष्ट्र विदेशी मद्य (आयात व निर्यात) नियम, १९६३ मध्ये आणखी सुधारणा करून खालील नियम तात्काळ अंमलात आणावेत आणि म्हणून हे नियम, महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम (१९४९ चा पंचवीस) चे कलम १४३ चे पोट-कलम *(३)* मधील परंतुकानुसार तरतूद केल्याप्रमाणे आधी प्रकाशित न करता तात्काळ अंमलात आणावे.

त्याअर्थी, आता, महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ च्या कलम १४३ चे पोट-कलम (२) च्या खंड (एच १) च्या उपखंड (दोन) यासह पोट-कलम (३) च्या परंतुकाद्वारे तरतूद केल्याप्रमाणे व प्रदान करण्यात आलेला अधिकारांचा आणि याबाबत महाराष्ट्र शासनास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून याद्वारे महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र विदेशी मद्य (आयात व निर्यात) नियम, १९६३ मध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी खालीलप्रमाणे नियम करीत आहे :—

१. या नियमांना महाराष्ट्र विदेशी मद्य (आयात व निर्यात) (दुसरी सुधारणा) नियम, २०१९ असे संबोधण्यात यावे.

२. महाराष्ट्र विदेशी मद्य (आयात व निर्यात) नियम, १९६३ च्या नियम ९ ए मधील खंड (३) मधील उपखंड (iii) ऐवजी खालील मजकूर दाखल करण्यात येत आहे :—

(iii) " मद्याच्या प्रत्येक लेबलवर अन्न सुरक्षा आणि प्रमाणक प्राधिकरण (FSSAI) यांनी वेळोवेळी विहीत केल्याप्रमाणे व नमुन्यामध्ये वैधानिक इशारा ' मद्य सेवन आरोग्यास हानीकारक आहे. सुरक्षित रहा-मद्य सेवन करून वाहने चालवू नका ' असे मुद्रीत करण्यात येईल. "

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**पु. हि. वागदे,**
शासनाचे सहसचिव.

**HOME DEPARTMENT**

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai 400 032, dated 19th September 2019

*NOTIFICATION*

MAHARASHTRA PROHIBITION ACT.

No. MIS. 0319/CR 92/EXC-3.—Whereas the Government of Maharashtra considers that the following rules further to amend the Maharashtra Foreign Liquor (Import and Export) Rules, 1963, should be brought into force at once, and therefore, the rules should be made without previous publication as provided by the proviso to sub-section *(3)* of section 143 of the Maharashtra Prohibition Act (XXV of 1949) ;

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub-clause *(ii)* of clause *(h 1)* of sub-section *(2)* read with the proviso to sub-section *(3)* of section 143 of the Maharashtra Prohibition Act and all other powers enabling it in this behalf, the Government of Maharashtra hereby makes the following rules further to amend Maharashtra Foreign Liquor (Import and Export) Rules, 1963, as follows, namely :—

1. These rules may be called the Maharashtra Foreign Liquor (Import and Export) (Second Amendment) Rules, 2019.

2. In rule 9A of the Maharashtra Foreign Liquor (Import and Export) Rules, 1963, in clause (3) for sub-clause (iii), the following sub-clause shall be substituted, namely :—

*(iii)* A statutory warning "Consumption of Alcohol is injurious to health. Be safe—Don't Drink and Drive" in the format and as prescribed by the Food Safety and Standards Authority of India (FSSAI) from time to time shall be printed on every label."

By order and in the name of the Governor of Maharashtra,

P. H. WAGDE,

Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR DR. NAMDEO KONDAJI BHOSALE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 EDITOR : DIRECTOR DR. NAMDEO KONDAJI BHOSALE.